**अमरावती महानगरपालिका, अमरावती**
**दिनांक १९.०८.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक २६ :-** स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० अंतर्गत "स्वच्छ सर्व्हेक्षण २०२३" कचरामुक्त शहर (स्टार रेटिंग), ODF++/वॉटर+ च्या अनुषंगाने माहिती अवलोकनार्थ व मंजुरी करीता

**ठराव क्रमांक २६ :-** उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत "स्वच्छ सर्व्हेक्षण २०२३" कचरा मुक्त शहर (स्टार रेटिंग) ODF++/वॉटर+ च्या अनुषंगाने अमरावती शहराकरीता उत्तम गुणानुक्रम निश्चित करण्याकरीता खालील उपक्रम स्वच्छता विभागामार्फत राबविण्यात येत आहे. सदर सर्व्हेक्षण हे एकुण ९५०० गुणांचे राहणार आहे.

**भाग १: सेवा स्तरावरील प्रगती (एकुण ४५२५ गुण)**

१) वर्गीकृत कचरा संकलन- १७५० गुण
२) प्रक्रिया व विल्हेवाट-१८३० गुण
३) शाश्वत स्वच्छता व सफाईमित्र सुरक्षा-९४५ गुण

**भाग २ : प्रमाणीकरण (एकुण २५०० गुण)**

१) कचरामुक्त शहर (Garbage Free City) Star Ranking-३/५/७ स्टार अंतर्गत "स्वच्छ सर्व्हेक्षण २०२३" मध्ये कचरा मुक्त शहर (Garbage Free City) Star Ranking चे स्वच्छ भारत अभियान केंद्र सरकार प्रतिनिधी द्वारे अमरावती शहरामध्ये तपासणी करण्यात येणार आहे. या अनुषंगाने आपले शहराचे कचरामुक्त शहर (Garbage Free City) Star Ranking करीता सर्व्हेक्षण झाल्यास "स्वच्छ सर्व्हेक्षण २०२३" करीता आपल्या शहराला जास्तीत जास्त गुणांकन प्राप्त होतील व अमरावती शहर कचरामुक्त शहर (Garbage Free City) ३/५/७ Star Ranking शहर घोषित करण्यात येईल.
२) ODF Status: शहर हागणदारीमुक्त करण्यात आलेले आहे.
३) ODF+ Status: शहर ODF+ करण्यात आलेले आहे.
४) ODF++ Status: शहर ODF++ करण्यात आलेले आहे.
५) Water+ चे स्वच्छ भारत अभियान केंद्रीय समितीद्वारे अमरावती शहरामध्ये तपासणी करण्यात आली असून Water+ बाबतचे निकाल घोषित करणे अद्याप बाकी आहे.

**भाग ३: नागरिक प्रतिबध्दता, नागरिकांच्या प्रतिक्रया व प्रत्यक्ष निरिक्षण (एकुण २४७५गुण )**

अमरावती शहरातील नागरिकांकडुन केंद्रीय समितीद्वारे "स्वच्छ सर्व्हेक्षण २०२३" व शहरातील स्वच्छते संदर्भात च्या कामकाजाबाबत काही प्रश्नांची फोनद्वारे तसेच प्रत्यक्ष निरिक्षण करते वेळी विचारणा करण्यात येणार आहे. माहिती, शिक्षण, संवाद आणि वर्तनातील बदल (IFC & Behavior Change) याबाबत शहरांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची तपासणी सोशय मिडिया फेसबुक, स्वच्छ मंच इत्यादी द्वारे प्रत्यक्ष निरिक्षण करते वेळी करण्यात येणार आहे. "स्वच्छ सर्व्हेक्षण २०२३" च्या अनुषंगाने स्वच्छ भारत अभियाना केंद्रीय समितीद्वारे मार्फत शहराची पाहणी करण्यात येणार आहे.

वरील प्रमाणे "स्वच्छ सर्व्हेक्षण २०२३" च्या अनुषंगाने केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या माहिती पुस्तिकेनुसार कार्यवाही मनपा स्तरावर करण्यात येत आहे. सदर विषय सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ व मंजुरीस सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयाचे अवलोकन करुन मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

| | | |
|---|---|---|
| **स्वा/-** | | **स्वा/-** |
| **नगरसचिव,** | नगरसचिव | **प्रशासक,** |
| **महानगरपालिका,अमरावती** | महानगरपालिका, अमरावती. | **महानगरपालिका,अमरावती** |